(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIII / Issue – III ISSN 2277-8063

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आधुनिक साहित्यविषयक विचार

**प्रा. माधवी सुरेंद्र पवार** मराठी विभाग कृष्णा महाविद्यालय रेठरे बु.

---

**प्रस्तावना :-**

बाबासाहेब आंबेडकरांचे 'भारतीय साहित्य विषयक विचार' हे एक स्वतंत्र जीवनदृष्टीचे व सखोल वाङ्मय दृष्टीचे प्रतीक आहेत. त्यांच्या या क्रांतिशील वैचारिक दृष्टिकोणाने केवळ भारतातच नव्हे तर जागतिक पातळीवर आधुनिक ऐतिहासिक पार्श्वभूमी प्रस्थापित केली आहे. त्यांच्यामुळेच आधुनिक क्रांतिकारी युगाची पहाट भारतात उगवली आहे असे आढळून येते.

बहुजनांना शूद्र, अतिशूद्र व आदिवासी बनवून त्यांना सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक,' साहित्य कला यापासून वंचित केले होते. बाबासाहेबांनी त्याविरुध्द एक क्रांतिकारी लढा दिला आणि इतिहासातील शोषणतत्वाला शोधून अत्यंत प्रभावीरित्या मांडले. एवढेच नव्हेतर त्यांनी नव युगासाठी समताधिष्ठीत मूल्यांच्या आधारे नव्या समाजरचना निर्मितीत समग्रजीवनाचे योगदान दिले. बाबासाहेब आंबेडकरांना समकालीन असलेल्या विचारवंतापेक्षा त्यांची साहित्यदृष्टी एक क्रांतिकारी सिद्धांत ठरली आहे. त्यांनी दिलेली ही कसोटी ही सर्व श्रमिक, अस्पृश्य, आदिवाशी, शूद्र, स्त्रिया व मागासलेल्या बहुजनांची उन्नती आहे. त्यांच्या सुख दुःखांना आशा-आकांक्षाना व मानवतांवादी मूल्यांना महत्त्व देणारा विचार त्यांनी साहित्यविचार मानल्याचे दिसून येते. बुद्धिवाद, विज्ञानवाद, भौतिकवाद, लोकशाही मूल्यविचार इत्यादी सर्व मानवी मनाचा कल्याणाचा विचारांना आणि प्रबोधनाच्या भावसंवेदना साहित्य-कला यांचे केंद्र मानले म्हणून त्यांनी ब्राह्मणी शोषणाची ग्रंथसंपदा नाकारली आणि बौद्धसाहित्य विचारातील 'बहुजन हितय बहुजन सुखाय' हा भावमैने भारावलेला विचार स्वीकारला.

बाबासाहेबांचे साहित्य व कलाविषयक विचार अतिशय सखोल असून त्यांच्या या सखोल चिंतनातून आधुनिक मराठी साहित्य विचारातून त्यांनी नवा साहित्यविषयक दृष्टिकोन दिला. साहित्य आणि जीवन यांच्या परस्पर संबंधातून चिकित्सा झालीच पाहिजे. बाबासाहेबांच्या प्रेरणेतून मराठी भाषेत दलित साहित्य ही क्रांतिकारी चळवळ उदयास आली. आज ती हिंदी, पजाबी, गुजराथी, कन्नड, बंगाली... इत्यादी भारतीय भाषेतून झपाट्याने विकसित होत आहे आणि आज दलित साहित्याची चळवळ जागतिक पातळीवरची वाङ्मयीन चळवळ ठरु पाहते आहे. भारताच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक व इतिहास यांची चिकित्सा व शोधमात्रा त्यांच्याच प्रेरणेतून सुरु झाली. आंबेडकर संस्कृतीच्या संवर्धनासाठी व बहुजनाच्या सांस्कृतीक संवेदनाच्या रुपासाठी बाबासाहेबांच्या विचाराचा शोध घेणे अत्यावश्यक ठरते. त्यांच्या विचाराची मदत आजच्या काळातील अंदोलनाला यशस्वी बनवू शकते. एवढेच नव्हे तर आधुनिक भारतीय समाज निर्मितीच्या संवेदनेला बाबासाहेबांचीच विचारधाराचा उपयुक्त ठरते. तसेच या दृष्टीने बाबासाहेबांनी विविध प्रसंगी वाङ्मयविषयक विचार मांडलेले आहेत. त्या विचारांचा शोध घेऊन अन्वायार्थ लावण्याचा प्रयत्न करण्याचे योजिलेले आहे.

**उद्दिष्टे –**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आधुनिक साहित्याविषयाच्या विचाराचा अभ्यास करणे.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वाङ्मयीन दृष्टीचा अभ्यास करणे.
3. डॉ. आंबेडकर यांचे आधुनिक साहित्य चळवळीचा विचार करणे.
4. आधुनिक साहित्यातील प्रश्नांचा अभ्यास करणे
5. आधुनिक साहित्याचा प्रेरणास्त्रोत डॉ. आंबेडकरांचा अभ्यास करणे.

**बाबासाहेबांची वाङ्मयीन दृष्टी:-**

बाबासाहेबांनी आपली वाङ्मयीन विचार अनेक भाषा संमेलनातून आणि लेखनांतून मांडलेली आहेत. त्यांचा आता येथे विचार करावयाचा आहे. बाबासाहेबांना 'लिटरेचर' या शब्दाचे 'साहित्य' हे भाषांतर चुकीचे वाटले असून त्याऐवजी वाङ्मय हा शब्दच योग्य व समर्पक वाटला आहे. नागपूर येथील विदर्भ साहित्य संघातील अध्यक्षीय भाषणांत साहित्यिकांना बाबासाहेबांनी केलले आवाहन लक्षात घ्यावे लागते सदर भाषणांत बाबासाहेब म्हणतात " मला साहित्यकारांना आवर्जून सांगावयाचे आहे की, उद्दात्त जीवनमूल्ये आपल्या साहित्य प्रकारातून अविष्कृत करा. आपले लक्ष आंकुंचित मर्यादित ठेवू नका. ते विशाल बनवा, आपली वाणी चार भिंतीपुरती राखू नका. तिचा विस्तार होऊ द्या. आपली लेखणी आपल्या प्रश्नांपुरती बंदिस्त करु नका. तिचे तेज खेड्यापाड्यातील गडद अंधार दूर होईल असं प्रवर्तित करा... आपल्या देशात उपेक्षितांचे, दलितांचे फार मोठे जग आहे हे विसरु नका. त्यांचे दुःख, त्यांची व्यथा समजून घ्या आणि आपल्या साहित्याद्वारे त्यांचे जीवन उन्नत करण्यास झटा. त्यातच खरी मानवता आहे. असे लेखकांना बाबासाहेबांनी कळकळीने आव्हान केले होते. यावरुन त्यांची साहित्यविषक व्यापक दृष्टी स्पष्ट होते. बाबासाहेबांची दलित समाजा बद्दलची तीव्र तळमळ दिसून येते. मराठी वाङ् मयाचे अधुरेपण त्यांना जाणविले होते. लेखकांची अपरिपक्वता त्यांनी ओळखली होती. असे वरील भाषणांवरुन दिसून येते. ऐवढेच नव्हे तर साहित्याचे मानदंड आणि साहित्याकडे बघण्याचा अभिनव दृष्टिकोनही त्यांनी निश्चितपणे विकसित केला होता. हेही दिसून येते. त्यामुळेच बाबासाहेबांनी तर आपले ऐतिहासिक युगच निर्माण केले असून त्यांची साक्ष आधुनिक भारतातील झालेली सामाजिक, शैक्षणिक क्रांतीच देत आहे. 1960 नंतर महाराष्ट्रात आंबेडकराच्या प्रेरणेने दलितांच्या विद्रोही साहित्याचे पर्व सुरु झाले. मराठीसाहित्यात या साहित्याने 'आंबेडकर पर्व' सुरु केले. दलित

साहित्य एक ज्वलंत क्रांतिकारी आंदोलनच बनले. या साहित्याचा जन्म बाबासाहेबांच्या प्रेरणेतून झाला. बाबासाहेबांनी प्राचीन साहित्याचे सखोल वाचन व चिंतन केले होते. अर्वाचीन साहित्याचेही त्यांनी चौकसपणे वाचन केले होते. इंग्रजी साहित्य, मराठी संत साहित्य, हरिभाऊ आपटे, गडकरी यांचे साहित्य त्यांनी वाचले होते. एवढेच नव्हे तर ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर यांचे भाषा वैभव त्यांना आवडत असे. त्यांची कवने तोंडपाठ करुन त्यांच्या काव्यावर सखोल विचार व चिंतन केलेले आढळते.

बाबासाहेब जीवनज्ञानप्रत्ययवादी आहेत. तसेच ते जीवनदर्शनवादी आहेत. ते म्हणतात - "जीवनात भेद न राखला जावा व सदैव दक्ष व जागरुक राहून कल्याण साधले जावे असेच वाङ्मय किंवा साहित्य निर्माण व्हावयास हवे... तरच त्याला वाङ्मय म्हणायचे आणि उद्धारक साहित्य मानावयाचे...". इत्यादी बाबी साहित्यकारांना त्यांनी वारोवार सांगितल्याचे दिसून येते. यावरून बाबासाहेबांचा वास्तववादी जीवनवादी दृष्टिकोन प्रकर्षाने जाणवतो. आजच्या समाजजीवनात आणि राष्ट्रीयजीवनात प्रगत होणारे साहित्यशास्त्र निर्माण होत नाही. आपल्या देशाला एकात्मतेची व बंधुत्वाची नितांत गरज आहे. एकात्मता बंधुता हा आपल्या राष्ट्राचा गाभा ठरला पाहिजे. त्याशिवाय प्रबळ संघशक्ती निर्माण होणार नाही. म्हणूनच साहित्यकलेतून मानवतावादी शास्त्र निर्माण होणे अत्यावश्यक आहे. यासाठी साहित्य क्षेत्रात राष्ट्रोपयोगी साहित्याच्या क्रांतीची लाट उसळली पाहिजे. पण त्या सिध्दतेसाठी जोश आणि प्रेम नाही. त्यामुळे तर अलिकडे साहित्याच्या कडा काळवंडत चाललेल्या आढळतात. आंर्तमुख होऊन विचार केल्यास आपली जीवनमूल्ये करपून जात आहेत यांचे भेसूर चित्र उभे राहते.

अधःपतनाच्या व अवनतीच्या मार्गावर जाताना तत्परतेने सावध होऊन जीवन व संस्कृतिविषयक मूल्ये साहित्यकारांना जोपासली पाहिजेत. उदात्त जीवनमूल्ये व सांस्कृतिक मूल्ये आपल्या साहित्यप्रकारातून अविष्कृत केली पाहिजेत. साहित्यसाधनेच्या गतीने उद्धात हृदयाच्या स्पर्शाने जीवन विकसित व उन्नत झाले पाहिजे. तरच तो वाचस्पती आणि तर तो साहित्यकार... अशी साहित्यकारांची बाबासाहेब व्याख्या केलेली दिसून येते. कला व रंजनवादी साहित्याबद्दल निराशा व्यक्त करतांना ते म्हणतात 'आजचं किंतूचं कथा, काव्य, नाट्यशास्त्र समजू शकत नाही, त्यात ज्ञानबोध तर नाहीच पण उद्दात लालित्य पण नाही, ना कसला कलानंद !' यावरुन बाबासाहेबांनी साहित्याची किती गंभीरपणे दखल घेतली होती, याची प्रचिती येते.

**5.5 बाबासाहेबांचे आधुनिक मराठी साहित्य विषयक विचार :-**

जोतीराव फुले, लोकहीतवादी आगरकर, बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी आधुनिक मराठी साहित्याचे स्वरुप उदयास आले. आणि साहित्याची पारंपरिक दृष्टी बदलून टाकण्याची क्रांतिकारी साहित्य चळवल निर्माण झाली. बाबासाहेबांच्या क्रांतिकारी या साहित्य विचार परंपरेला रोखण्याचा प्रयत्न पारंपरिक ब्राह्मणवादी साहित्य परंपरेने निकराने केल्याचे आढळते. या प्रतिगामी विचार परंपरेचे प्रतिगामी जीवनदर्शनाचा साहित्य प्रवाहही आधुनिक मराठी साहित्यात आधुनिक या नावाखाली निर्माण झालेला आढळतो. त्यांची ही पारंपरिक चळवळ मोठ्या ताकतीने व कुटील नितीने साहित्यप्रवाहात फोफावलेली आढळते.

बाबासाहेबांच्या आंबेडकरी साहित्य चळवळीने आंदोलनाचे व साहित्य मीमांसाने मात्र समग्र आधुनिक एक नवे क्रांतिकारी वळणच घेतले. त्यांच्या चिंतनातून एक आधुनिक साहित्य चळवळच जोमाने फोफावत गेलेली स्पष्ट रुपात आढळते. त्यांच्या समीक्षा चिंतनाचे स्वरुप 'आंबेडकर वाद व आंबेकरी साहित्य' या नावाने संबोधन्यात येऊ लागले. त्यांचा साहित्यविचार भारतीय साहित्याचा मापदंड मानण्यात आला. एवढा प्रभाव त्यांच्या साहित्यविचारामध्ये असल्याचे आढळते.

**आधुनिक साहित्यातील प्रश्न :-**

बाबासांहेबांच्या साहित्य विचारांने व क्रांतिकारी आंदोलनांने आधुनिक साहित्यात मूलभूत प्रश्न निर्माण केलेत. साहित्य म्हणजे काय? साहित्याचे प्रयोजन काय? साहित्याचे उद्दिष्ट काय असावे? साहित्यिकांनी कोणती दृष्टी आधुनिक साहित्यात रुजविली पाहिजे? भारतीय समाजातील बहुसंख्य लोकांचे जीवन व त्यांचे जगणे साहित्यिकाने का रेखाटावी? वर्णव्यवस्थेने व जातीयवादाने घडविलेले श्रेष्ठ व कनिष्ठतेचे संस्कार बंधुभावाचे आहेत का? वैदिक ब्राह्मणी विचार साहित्यांने अस्पृश्य, शूद्र, आदिवासी यांना पशुतुल्य जीवन दिले. ते आजही गौरवास्पद म्हणणे योग्य आहे का? या साहित्यातील आशय प्राचीन गुलामगिरीचा असावा की लोकशाहीचा असावा? साहित्यात गुलामीचा आशय योग्य की लोकशाहीचा? प्रबोधनवादी व समाजवादी विचार आधुनिक की स्वर्ग, ईश्वर, भक्ती हा विषमतावादाचे पोषण करणांरा विचार श्रेष्ठ आज कोणत्या विचाराची देशाला व साहित्याला गरज आहे. आधुनिक साहित्यात आधुनिक विचार कोणते? आधुनिक साहित्यात कोणते आधुनिक जीवन दर्शन घडावे?... इत्यादी मूलभूत प्रश्नांबाबत बाबासाहेबांचे साहित्यचिंतन मूलगामी स्वरुपाचे ठरले आहे.

**आधुनिक साहित्याचे प्रेरणास्थान: बाबासाहेब आंबेडकर :-**

आधुनिक साहित्याचे स्वरुप आणि परंपरा पाहता त्याचे प्रेरणा स्थान बाबासाहेबांच्याकडेच जाते. प्रस्तापित मराठी साहित्य संकुचीत व खुजे ठरुन आधुनिक साहित्याने मराठी साहित्य व्यापक व सदृश्य केले आहे. दलित साहित्य चळवळीने त्यांचा विचार प्रेरणास्थान मानलेला आहे. बाबासाहेबांच्या जन्म शताब्दीवर्षात 'फुले आंबेडकर साहित्य' या नावाखाली दलित, ग्रामीण, आदिवासी, जनसाहित्य... ओळखू जाऊ लागले. बाबासाहेबांच्या प्रतिभेने समग्र भारतीय समाज ढवळून काढला. बाबासाहेबांनी मराठी साहित्याबद्दल स्वतःची भूमिका मांडली. आपल्या क्रांतीकारी भूमिकेतून साहित्य समीक्षेला एक नवी दिशा दिली. आपल्या साहित्य व समाजचिंतनातून मराठी साहित्याला आधुनिक वाङ्मयीन दृष्टी दिली. त्यांच्या साहित्य विचारांतून समाजजीवन याचे विराट दर्शन घडते. मानवी जीवनातील समताधिष्ठित मूल्ये रुजविण्याची त्यांची पराकष्टा आढळते. समता विचाराची बीजतत्त्वे कलावंतांनी

साहित्यांतून मांडली पाहिजेत. ही समाजबांधिलकी त्यांनी रुजविली. बाबासाहेब हे प्रतिभेचे युगप्रवर्तक महान तत्त्वज्ञ लेखक होते. त्यांनी विपुल लेखन केले असून, त्यांची ग्रंथसंपदा भारतीय समाजाला दीपस्तंभाप्रमाणे दिशा देणारी आहे. त्यांच्या ग्रंथ संपदाची भारतीय समाज्याला अत्यंत आत्यावश्यकता आहे. भारतीय समाजाचे शक्तीवर्धक म्हणजे त्यांचे समग्र साहित्य होय. हजारो वर्षापासून अस्पृश्य लोकांचा एक मोठा वर्ग आर्थिक सामाजिक आधिकारापासून वंचित केला होता. बाबासाहेबांनीच या समग्र समाजाला क्रांतिकारी विद्रोही चेतना दिली. आणि त्यांच्याच माध्यमातून बुद्ध विचाराची प्रेरणा आधुनिक भारताला दिली. जीवन जगण्याची एक सुंदर पद्धती त्यांच्या रुपाने भारतात निर्माण झाली. बुद्ध प्रणितच लोकशाहीची प्रेरणा भारतास बाबासाहेबांच्यामुळेच लाभली. एकंदरीत बाबासाहेबांचे विचार व जीवनकार्याचे मूल्यमापन करता आधुनिक भारताचे ते प्रेरणास्थान तर आहेतच शिवाय आधुनिक युगाचे ते प्रवर्तकही असल्याचे आढळते. त्यांचे मराठी लेखन वैचारिक व चिंतनशील आहे. सत्यान्वेषण, परखड प्रतिपादन, अमोघ युक्तिवाद, उपरोध, ओजस्वीता आणि बहुश्रुतता यामुळे त्यांचे लेखन मराठी वैचारिक वाङ् मयाला श्रीमंत करणारे ठरलेले आढळते.

त्यांच्या लेखनात भावविवशतेला स्थान नाही, कठोर तर्कवाद आणि ठाम भूमिका हाच त्यांच्या लेखनाचा गाभा आढळतो. त्यांचे अंतकरण सामाजिक दुर्दशेने व्यथित होत असले तरी त्यांच्या अभिव्यक्तीत हळवेपणा येत नाही. नेटक्या व नेमक्या भाषेचा व अर्थपूर्ण शब्दांचा वापर हा त्यांच्या लेखनशैलीचा एक विशेष आढळतो. अप्रस्तुतना, विस्कळीतपणा आणि तर्कदुष्टता यांच्यापासून त्यांची लेखनी अलिप्त वाटते. समृध्द अशयामुळेच त्यांची भाषा प्रवाही आणि प्रभावी जाणवते. विविध भाषातील म्हणींचा, वाक्यप्रचारांचा, वचनांचा, कथांचा उपयोग ते भाषा सजविण्यांसाठी करीत नाहीत, तर आपला आशय अधिक स्पष्ट करण्यांसाठी ते करतात. शब्द आणि भाषेची आतषबाजी पुष्कळदा विचारप्रवाहाला मारक ठरतात. याचे भान बाबासाहेबांना होते. क्वचित मिस्किलपणा पण प्रसंगविषेशी मार्मिकता या गुणांमुळे त्यांचे मराठी लेखन सशक्त व समृध्द झालेले दिसते. प्रबोधकता यामुळे त्यांचा क्रांतिकारी, बुद्धीप्रामाणिकवाद आकाराला येतो. चिकित्सा, वक्तृत्व, उत्कटता आणि तत्त्वचिंतन हे त्यांचे शैलीचे विशेष आढळतात. त्यांचे मराठी लेखन अभिजात वाड्:मयीन दृष्टीचे चिरंतन लेणे असल्याचे आढळते. आजही त्यांच्या समग्र साहित्याचे वाचन केले असता अशीच प्रचिती येते.

बाबासाहेबांनी भारतातील समग्र साहित्याचे वाचन केले होते. त्याचत्ररोबर अर्थशास्त्र, राजशास्त्र, समाजशास्त्र, धर्मशास्त्र, कायदा.इत्यादी विविध विषयांवरही ग्रंथ निर्मिती केलेली आढळते. भारतीय समाज जीवनात जी राजकीय आणि सामाजिक आंदोलने पेटली त्यामध्ये ते सक्रिय राहिले. चुकीच्या धोरणांवर त्यांनी कठोर टीका केली. लोकशाही समाजवादी मुल्यांचे त्यांनी समर्थन केले. आणि या मूल्यांना व मूल्य विचारांना पूरक असलेला प्राचीन धम्म विचार आधुनिक भारतीयांना दिला. या त्यांच्या श्रेष्ठ कार्यामुळे सावरकर भांबावून गेले. वर्णव्यवस्थावादी सावरकर चुकीच्या टीका करु लागले. लोकांच्या मनात जातीयवादासारखी चुकीच्या विचारांनी दिशभूल करु लागले. कारण त्यांना शूद्र, अस्पृश्य हे शब्द टाकून 'माणूस' हे बिरुद लावणारी समाजरचना नको होती. असे दिसते. म्हणूनच त्यांनी धम्म विचारावर टीका केली. बाबासाहेबांनी सावरकरांच्या लेखनाची व टीकेची बुद्धीवादी, विवेकवादी व ऐतिहासिक दृष्टीने मीमांसा केली. आधुनिक मराठी साहित्यात सावरकरांचा सामाजिक दृष्टिकोन हिंदुत्वाच्या श्रेष्ठ कनिष्ठ विचारांनी भरलेला असून निकोप नाही. कोणत्याही चांगल्या विचाराला जात नसेत, धर्म नसतो तो विज्ञानासारखा तो सर्वांचा असतो. जसे भारतीयांनी युरोपचे सर्व विज्ञान स्वीकारले तसेच चांगल्या विचाराचे असते

बासाहेबांनी ब्राह्मणी विचारांनी भरलेल्या त्यांच्या निबंधाची चिकित्सा करतांना ते म्हणाले, 'बुद्ध धर्मावर बरेच लोक खोडसाळपणे टीका करतात, त्यापैकी सावरकर एक होत. भगवान बुद्धाचा जो अफाट भिक्षु संघ होता त्यात शेकडा पंच्याहत्तर टक्के ब्राह्मण होते. हे सावरकरांना माहीत आहे का? सारीपुत्त मोगलान सारखे पंडित ब्राह्मण बौद्ध होते. हे सावरकरांनी विसरु नये. पेशवे कोन होते, ते भिक्षु होते काय? मग त्यांच्या हातून इंग्रजांनी राज्य का हिसकावून घेतले? तेंव्हा अशा नादान व बेजबाबदार लोकांच्या आपण नादी लागू नये. काही लोंक म्हणतात सावरकर विष ओकले, मी तर म्हणतो, सावरकर नर्क ओकले. कुणी कितीही खोडसाळ टीका केली तरी माझा मार्ग निश्चित आहे. मी बुद्ध धर्माचाच स्वीकार करणार' यावरुन बाबासाहेबांची सावरकरांवरील घणाघाती टीका करतांना कोठेही तोल न जाता वस्तुनिष्ठ पातळीवर कठोर टीका केलेली आढळते. आदिवासींना सुधारण्याचा प्रयत्न का करण्यात आला नाही? असा प्रश्न बाबासाहेबांनी अनेक चवळवळींना विचारला. आणि आदिवाशी साहित्य जीवनाचे महत्त्व त्यांनी प्रतिपादिलेले आढळते. बाबासाहेबांचा साहित्य विचार शोषितांच्या प्रबोधनांसाठी उदयास आलेला विचार आहे. आपल्या या देशात उपेक्षितांचे, दलितांचे फार मोठे जग आहे. हे विसरू नका त्यांचे दु:ख, व्यथा निट समजून घ्या, आणि आपल्या साहित्याव्दारे त्यांचे जीवन उन्नत करण्यांस झटा. त्यातच खरी मानवता आहे". हा त्यांचा आधुनिक भारतीय साहित्याचा गाभा म्हणूनच विकशीत होण्याची ऐतिहासिकं गरज आहे. हा विचाराच जगात भारतीय साहित्याला प्रतिष्ठित करणारा आहे.

**समारोप**

अशाप्रकारे आधुनिक मराठी साहित्याचे पूर्व स्वरुप फुले, लोकहितवादी आगरकर, बाबासाहेब यांच्या आधुनिक विचारांने उदयास आले. परंतु खऱ्या अर्थाने बाबासाहेब हेच आधुनिक मराठी साहित्याचे प्रेरणास्थान ठरतात. फुले-आंबेडकर साहित्य, ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी, जनसाहित्य, बहुजन साहित्य आदी साहित्य प्रवाहाने बाबासाहेबांचे प्रेरणास्थांन प्रतिपादीत केलेले आढळते. आधुनिक साहित्याच्या नावाखाली प्राचीन प्रतिगामी विषय व आशय बाबत बाबासाहेबांनी घणाघाती टीका केली. त्याचबरोबर मध्ययुगीन सरंजामवादी विचार व ब्राह्मणी कथांनकास नापसंती प्रतिपादित केली. ब्राह्मणी विचाराचे आणि ब्राह्मणी

साहित्याचे आणि ब्राह्मणी साहित्यिकांचे कठोर परीक्षण केले. आधुनिक साहित्यात बुद्धाच्या व लोकशाहीच्या विचारात रुजविण्याचे बाबासाहेबांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केलेले आढळतात.

**निष्कर्ष –**

**1.** बाबासाहेब हे प्रतिभेचे युगप्रवर्तक महान तत्त्वज्ञ लेखक असून त्यानी समाजबांधिलकी साहित्यात रुजवली.

**2.** बाबासाहेबांनी बहुजनांना शूद्र, अतिशूद्र व आदिवासी सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, साहित्य कला यापासून वंचित ठेवलेल्यांच्या विरोधात एक क्रांतिकारी लढा देऊन इतिहासातील शोषणतत्वाला अत्यंत प्रभावीरित्या मांडले.

**3.** चिकित्सा, वक्तृत्व, उत्कटता आणि तत्त्वचिंतन हे बाबासाहेंबाच्या शैलीचे विशेष असून त्यांचे मराठी लेखन अभिजात वाड्मयीन दृष्टीचे चिरंतन लेणे आहे.

**4.** बाबासाहेबांचे साहित्य व कलाविषयक विचार अतिशय सखोल असून त्यांच्या या सखोल चिंतनातून आधुनिक मराठी साहित्य विचारातून त्यांनी नवा साहित्यविषयक दृष्टिकोन दिला

**5.** बाबासाहेबांच्या समीक्षा चिंतनाचे स्वरुप 'आंबेडकर वाद व आंबेकरी साहित्य' या नावाने ओळखण्यात येते.

**संदर्भ –**

1. पानतावणे गांगाधर , डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे निवडक लेख ,प्रतिमा प्रकाशन पुणे.
2. गांजरे मा.फ ,डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड ६ ,अशोक प्रकाशन नागपूर
3. खैरमाडे, चा.भं, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर खंड १ ,सुगावा प्रकाशन, पुणे
4. वानखेडे,म.ना ,दलितांचे विद्रोही वाड्मय ,नागपूर
5. शेंडे, ना.रा दलितांचे जग वेदना आणि शिष्टाई ,नागपूर
6. कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र ,पॉप्युलर प्रकाशन मुंबई